# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १३.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १८,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०४ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**चोरी** :—दिनांक १२/०९/२०२२ रोजी फिर्यादी मन्मथ टलय्या किर्तनकार रा गोंडाळा ता सेनगाव जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा ना.येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१०.०९.२०२२ रोजीचे रात्री अंदाजे ९.०० वा पासुन ते दिनांक ११.०९.२०२२ रोजीचे सकाळी ३.३० वा वंशेश्वर स्वंस्थान,गोंडाळा येथील महादेव मंदीरात अज्ञात चोरटयाने वंशेश्वर स्वंस्थान गोंडाळा येथील महादेव मंदीरातील ओटयावरील लोखंडी दानपेटी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेवुन दानपेटीचे कुलुपकोंडा तोडुन त्यामध्ये असलेली देणगी रक्कम अंदाजे २५,००० ते ३०,००० रूपयाची चोरी केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात औंढा ना.पोलीस तपास करित आहेत.